आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

१६ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रचारादरम्यान आदर्श आचारसंहिता उल्लंघन प्रकरणी भाजपा आणि काँग्रेसच्या अध्यक्षांवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या नोटिसा

- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी झंझावाती प्रचार

- निवृत्त आयपीएस अधिकारी डॉ. मीरा बोरवणकर यांना यंदाचा अनंत भालेराव स्मृती पुरस्कार जाहीर

**आणि**

- महिला हॉकी आशिया करंडक स्पर्धेतल्या सामन्यात भारतानं चीनला नमवलं

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकांच्या प्रचारात आदर्श आचारसंहितेचं पालन होत नसल्याच्या तक्रारी भाजपा आणि काँग्रेसनं एकमेकांविरोधात दाखल केल्यानंतर आज निवडणूक आयोगानं भाजपाचे अध्यक्ष जे पी नड्डा आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यावर वेगवेगळ्या नोटिसा बजावल्या. सोमवारी दुपारी एक वाजेपर्यंत दोन्ही पक्षांनी याबद्दल प्रतिसाद द्यावा, असं आयोगानं नोटिशीत म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकांसाठी २२ मे रोजी जारी केलेल्या सूचनांचं पालन करून दोन्ही पक्षांच्या स्टार प्रचारक आणि नेत्यांनी प्रचारादरम्यान सभ्यतेचं पालन करावं असंही या नोटिशीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

समाजातल्या प्रत्येक घटकाच्या सक्षमीकरणासाठी राज्यातल्या महायुती सरकारनं गेल्या अडीच वर्षात प्रयत्न केले असून जनता सरकारच्या कामाबद्दल पूर्ण समाधानी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. त्यांनी आज नमो

ॲपच्या माध्यमातून राज्यातल्या भाजपाच्या बूथ कार्यकर्त्यांशी संवाद साधला. 'मेरा बूथ सबसे मजबूत' ही या संवादामागची संकल्पना होती. मतदारांना भाजपाच्या संकल्पाची माहिती समजावून सांगून भाजपाला मतदान करण्याचं आवाहन प्रेमानं करावं, असं मोदी यांनी मार्गदर्शन करताना सांगितलं.

**<><><><><>**

कोकणाच्या विकासासाठी कोकण विकास प्राधिकरण करत असून विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. ते आज गुहागर मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार राजेश बेंडल यांच्या प्रचारसभेत बोलत होते. आपण स्वतःला मुख्यमंत्री नव्हे, तर कॉमन मॅन समजतो असं त्यांनी सांगितलं. राज्यात महायुतीचं सरकार आल्यावर महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला. देशातल्या परकीय गुंतवणुकीच्या ५२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

रत्नागिरी जिल्ह्यात दापोली इथंही एकनाथ शिंदे यांनी प्रचारसभा घेतली. महाविकास आघाडीवर जोरदार टीका करत आघाडीला कोकणात एकही जागा मिळणार नाही, असं शिंदे म्हणाले.....

**होल्ड बाईट शिंदे (३४ सेकंद)**

राज्यातल्या सर्वसामान्य माणसाला ताकद द्यायचं काम महायुतीचं सरकार नक्की करेल, असा विश्वास शिंदे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी इथं महायुतीचे उमेदवार दीपक केसरकर यांच्या प्रचारसभेत व्यक्त केला. कोकणचा अनुशेष कोकण विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून भरून काढू अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

मुंबईतली धारावी झोपडपट्टी अदानी उद्योगसमूहाला दिलेली नसून धारावी पुनर्विकास प्रकल्प सरकारी भागीदारीतून उभा राहत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज गडचिरोलीत देसाईगंज इथं प्रसारमाध्यमांशी बोलत होते. या प्रकल्पाची सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे होत असल्याचं त्यांनी सांगितलं. राजीव गांधी असताना त्यांनी धारावी पुनर्विकासाची घोषणा केली होती. मात्र, त्यानंतर २५ वर्ष काँग्रेसचं सरकार असतानाही धारावीचा विकास झाला नाही, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांचं ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज माफ करण्याचं आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज चंद्रपूर जिल्ह्यात चिमूर इथं प्रचारसभेत दिलं. मोदी सरकारनं देशातल्या मूठभर उद्योगपतींची अब्जावधी रुपयांची कर्ज माफ केली, असं ते म्हणाले. जीएसटीच्या माध्यमातून सरकार जनतेची लूट करत असून बड्या भांडवलदारांना कोट्यवधी रुपयांची सूट दिली जात आहे, अशी टीका गांधी यांनी केली.

**होल्ड-बाईट-गांधी (२० सेकंद)**

कापूस आणि सोयाबीन पिकांना हमीभाव, सर्वांना २५ लाख रुपयांपर्यंतचा वैद्यकीय विमा, महिलांसाठी राज्यात सर्वत्र मोफत एस टी प्रवास असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं जातीवर आधारित जनगणना करून आरक्षणावरची ५० टक्के मर्यादा हटवावी, असं काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी म्हटलं आहे. त्या आज शिर्डीत साकोरी इथं प्रचारसभेत बोलत होत्या. महाराष्ट्रातले उद्योग अन्य राज्यात स्थलांतरित करून राज्यात बेरोजगारी वाढीला लावण्याबाबत केंद्र तसंच राज्य सरकारला स्पष्टीकरण द्यावं लागेल, असं त्या म्हणाल्या. या सरकारनं संविधानाचं अवमूल्यन केल्याची टीका प्रियांका गांधी यांनी केली.कोल्हापूर इथंही प्रियंका गांधी यांची सभा झाली.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज कोल्हापूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

निवृत्त आयपीएस अधिकारी डॉ. मीरा बोरवणकर यांना यंदाचा अनंत भालेराव स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे. मीरा बोरवणकर यांनी महाराष्ट्र पोलीस दलात ३५ वर्षाहून अधिक काळ उल्लेखनीय कामगिरी केली असून त्या पोलीस संशोधन आणि विकास विभागाच्या महासंचालक पदावरून निवृत्त झाल्या आहेत. पन्नास हजार रुपये रोख, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या ८ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर इथं होणाऱ्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार हा प्रदान केला जाणार आहे.

**<><><><>**

राज्यात रेल्वेमधे १ लाख ६४ हजार ६०५ कोटी रुपयांची आणि मेट्रो मध्ये १ लाख १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं. राज्यातल्या १३२ स्टेशनचा अमृत भारत अंतर्गत विकास सुरू आहे. मुंबईत ३२० किलोमीटरचे नवे रेल्वे मार्ग टाकले जात आहेत. त्यासाठी १६ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक होत आहे. याशिवाय मनोरंजन क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळ यावं यासाठी Indian Institute of Creative Technology ची स्थापना करायला केंद्र

सरकारनं मंजुरी दिली आहे. यातली पाहिली संस्था मुंबईत सुरू होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

उद्योग, सेवा, कृषी क्षेत्रात पूर्वी आघाडीवर असलेल्या महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती चिंताजनक असल्याचं काँग्रेस नेते आणि माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबई प्रदेश काँग्रेसच्या वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**-<><><><><>**

राहुल गांधी विरोधी पक्ष नेता झाल्यानंतर संसदेत चर्चेचा आणि संवादाचा स्तर खाली गेल्याचा आरोप केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री आणि भाजपचे नेते किरण रिजिजू यांनी केला. ते आज नागपूरात भाजपा कार्यालयात वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, **मुंबईतल्या** वाशी चेकनाक्यावर आज एका ट्रकमधून सुमारे साडे आठ हजार किलो चांदी जप्त केली. मधे मुंबईहून आलेल्या पार्सलमधून सुमारे १ कोटी ६३ लाख रुपयांचे सोनं, चांदी आणि हिऱ्याचे दागिने आणि इतर मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोन जणांना अटक केली.

**जळगाव** जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून आजपर्यंत ४ कोटी २० लाख रुपयांची रोकड, दारू, अंमली पदार्थ आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**<><><><><>**

बिहारच्या राजगीर स्टेडियमवर सुरू असलेल्या महिला हॉकी आशिया करंडक स्पर्धेतल्या सामन्यात आज भारतानं चीनला ३-० अशा गोल फरकानं

हरवलं. आतापर्यंत चीनच्या संघाचा या स्पर्धेत एकदाही पराभव झाला नव्हता, मात्र आजच्या सामन्यातल्या विजयानं भारत आत्तापर्यंत या स्पर्धेत अपराजित राहिला आहे.

**<><><><><>**

काल दिवसभरात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भ आणि मराठवाड्यात हवामान कोरडं होतं. आजही कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून उर्वरित ठिकाणी हवामान कोरडं राहील. उद्या राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील.

**<><><><><>**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाचा टक्का वाढावा म्हणून  जिल्हा स्वीप कक्षाद्वारे वेगवेगळे उपक्रम राबवण्यात येत आहेत. यात आज तुळजापूर, पालघर आणि अमरावती शहरात विद्यार्थी रॅलीचं आयोजन करण्यात आलं.

**//<><><><><>//**